जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 APR 2022
लोकमत


# विश्वात्मक संतसाहित्य संमेलनाचा ग्रंथदिंडीने प्रारंभ

## वारकऱ्यांचा सहभाग : कोल्हापुरात भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते आज उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाघापूर/सरवडे** : कोल्हापुरातील पहिल्या विश्वात्मक संतसाहित्य संमेलनाचा आदमापूर येथे ग्रंथदिंडीने प्रारंभ झाला. वारकऱ्यांसह टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठलनामाच्या जयघोषात ग्रंथदिंडी निघाली. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज, मंगळवारी सकाळी ११ वाजता कोल्हापुरातील महासैनिक दरबार हॉल येथे संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.

पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ, मंत्री उदय सामंत, राजेंद्र पाटील-यड्रावकर, डॉ. प्रकाश खांडके उपस्थित असणार आहेत. पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर, संस्कृती मंत्रालय भारत सरकार व इंडसमून मीडिया प्रा. लि.तर्फे संमेलन होणार आहे. ग्रंथदिंडीमध्ये ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा होती. हनुमान मंदिराजवळ भाविक, वारकरी व महिलांनी फुगडी खेळत दिंडीत रंग भरला. बाळूमामांच्या मंदिरात सांगता झाली. संमेलनाचे अध्यक्ष डॉ. मदन गोसावी आणि डॉ. रामचंद्र देखणे यांनी संत बाळूमामांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. गोसावी व देखणे यांचा देवस्थान समितीतर्फे अध्यक्ष धैर्यशील भोसले यांच्या हस्ते व रामभाऊ मगदूम यांच्या उपस्थितीत सत्कार झाला. अध्यक्ष गोसावी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. यावेळी ग्रंथ व वीणापूजन झाले. विशाल जानवे, खांडगे, निपुण सिंघवी, सबिताई गोसावी, सुमेधा शिवदे, बाळकृष्ण गिरी, आदी उपस्थित होते. जिल्हा वारकरी मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव वागवेकर यांनी प्रास्ताविक केले. मानसिंग किल्लेदार यांनी आभार मानले. संमेलनाचा समारोप माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्रिपुराचे उपमुख्यमंत्री जिश्नुदेव वर्मा, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत उद्या, बुधवारी होणार आहे.



कोल्हापुरातील पहिल्या विश्वात्मक संतसाहित्य संमेलनाचा प्रारंभ आदमापूर येथे सोमवारी ग्रंथदिंडीने झाला. (छाया : बाजीराव जठार, वाघापूर)

### संत संमेलनातून विद्वेषात्मक संदेश नको : नारकर

- कोल्हापूर : कोल्हापुरात विश्वात्मक संत साहित्य संमेलन होत आहे. विश्वात्मकतेला मानवतावादाचा आशय असला पाहिजे. अशा संमेलनात सामाजिक विद्वेषाला प्रोत्साहन देणाऱ्या संमेलनाच्या अध्यक्षांची कारकीर्द सामाजिक सद्भाव वाढवण्यास फारशी उपयुक्त ठरली आहे, असे म्हणवत नाही, असे माकपचे राज्य सचिव डॉ. उदय नारकर यांनी म्हटले आहे.
- प्रसिद्धीपत्रकात ते म्हणतात, विशेषतः छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षात कोल्हापुरात भरत असलेल्या या संमेलनात शाहू विचाराच्या विरोधी विचारांना थारा देणे अपेक्षित नाही. कोल्हापूरची भूमी ही याच विचारांवर पोसली आहे. विश्वात्मकचे नाव घेऊन त्यात दरी निर्माण होईल, असे प्रयत्न या व्यासपीठावर होऊ नयेत एवढीच संयोजकांकडून माफक अपेक्षा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 APR 2022

लोकमत

# विद्यापीठात आज राष्ट्रपती सुवर्णपदक प्रदान कार्यक्रम

## राज्यपाल कोश्यारी यांची प्रमुख उपस्थिती : कुलपती पदक, विशेष पारितोषिकाचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभात घोषित करण्यात आलेली राष्ट्रपती आणि कुलपती सुवर्णपदक प्रदान कार्यक्रम आज, मंगळवारी दुपारी बारा वाजता राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमात शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिकेही प्रदान केली जाणार आहेत, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी सोमवारी दिली.



विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त समारंभ शनिवार, दि. ५ मार्च रोजी राज्यपाल कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाइन झाला. या समारंभात विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रपती सुवर्णपदक आणि कुलपती सुवर्णपदक प्राप्त स्नातकांच्या नावांची घोषणा करण्यात आली. त्यात सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र आणि एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरल्याबद्दल विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या ऐश्वर्या आकाराम मोरे (मु.पो. वडरगे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) या विद्यार्थिनीस राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले.

एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती गुंडू पाटील (मु. पो. दानोळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले. त्यांना राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते सुवर्णपदके प्रदान करणार आहेत.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील कॅंट क्लब, कोल्हापूर निर्मित 'शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्रावीण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह' मयुरेश मधुसूदन शिखरे (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर) या विद्यार्थ्यास प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. शिंदे यांनी दिली. दरम्यान, राज्यपाल कोश्यारी यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पोलिसांनी विद्यापीठातील कार्यक्रमस्थळाची सुरक्षिततेची तपासणी केली.

पुढारी

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आज कोल्हापूर दौऱ्यावर



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे मंगळवारी (दि. ५) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. पहिले विश्वात्मक संत साहित्य संमेलनाचे उद्घाटन आणि शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, राज्यपाल कोश्यारी यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सोमवारी पोलिसांनी विमानतळ ते सर्किट हाऊस आणि महासैनिक दरबार हॉल ते शिवाजी विद्यापीठ या मार्गावर बंदोबस्ताची रंगीत तालीम घेतली.

राज्यपाल कोश्यारी यांचा दौरा असा : सकाळी १०.१५ वा. कोल्हापूर विमानतळ येथे आगमन. १०.२० वा. विमानतळ येथून मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे **पान २ वर »**

# राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आज कोल्हापूर दौऱ्यावर

**(पान १ वरून)** प्रयाण. १०.५५ वा. शासकीय विश्रामगृह येथून महासैनिक दरबार हॉल. ११ वा. महासैनिक दरबार हॉल येथे आयोजित पहिल्या विश्वात्मक संत साहित्य संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमास उद्घाटक म्हणून उपस्थिती. ११.४५ वा. महासैनिक दरबार हॉल येथून शिवाजी विद्यापीठाकडे प्रयाण. दुपारी १२ वा. शिवाजी विद्यापीठातील शाहू हॉल येथे आयोजित प्रेसिडेंट व चॅन्सलर ॲवॉर्ड कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती.

दुपारी १२.४५ वा. शिवाजी विद्यापीठ येथून कोल्हापूर विमानतळाकडे प्रयाण. दुपारी १ वाजता हेलिकॉप्टरने मुंबईकडे ते प्रयाण करतील.

पुढारी

# विद्यापीठात आज राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रपती, कुलपती सुवर्णपदक प्रदान

कोल्हापूर : राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते मंगळवारी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभात घोषित केलेली राष्ट्रपती व कुलपती यांची सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १२ वाजता हा कार्यक्रम होईल, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. रसायनशास्त्र अधिविभागातील द्वितीय वर्षातील ऐश्वर्या मोरेला (मु. पो. वडरगे, ता. गडहिंग्लज) राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर झाले. एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती पाटील (मु.पो. दानोळी, ता. शिरोळ) हिला कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले. दोन्ही विद्यार्थिनींना कुलपती कोश्यारी यांच्या हस्ते सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत.

पुण्यनगरी

# राज्यपाल आज शिवाजी विद्यापीठात

## राष्ट्रपती, कुलपती सुवर्णपदक प्रदान समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते मंगळवार, दि. ५ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत समारंभात घोषित करण्यात आलेली राष्ट्रपती व कुलपती यांची सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत, तसेच शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिकही प्रदान करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी १२ वाजता हा कार्यक्रम होईल, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र आणि एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्त्व, शारीरिक



आरोग्य, भाषा शुद्धता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्वगुण यामध्ये आदर्श ठरल्याबद्दल विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या श्रीमती ऐश्वर्या आकाराम मोरे (मु.पो. वडरगे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) या विद्यार्थिनीस शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले. त्याचप्रमाणे एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या श्रीमती स्वाती गुंडू पाटील (मु.पो. दानोळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) या विद्यार्थिनीस ▸▸ पान ५ वर

राज्यपाल आज शिवाजी विद्यापीठात

कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले. या दोन्ही विद्यार्थिनींना कुलपती कोश्यारी यांच्या हस्ते सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील केंट क्लब, कोल्हापूर निर्मित 'शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्रावीण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह' मयूरेश मधुसूदन शिखरे (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर) या विद्यार्थ्यास प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहितीही कुलसचिव डॉ. शिंदे यांनी दिली.

सकाळ

# राज्यपालांच्या हस्ते आज विद्यार्थ्यांना पदके प्रदान


कोल्हापूर : राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते मंगळवारी (ता. ५) विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभात घोषित केलेली राष्ट्रपती व कुलपती यांची सुवर्णपदके प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच, शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिकही प्रदान करण्यात येईल. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दुपारी बाराला कार्यक्रमास सुरुवात होईल. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' https://www.youtube.com/c/ShivVarta) या यूट्यूब वाहिनीवरून करण्यात येणार आहे.

तरुण भारत

# राष्ट्रपती, कुलपती सुवर्णपदकाचे आज राज्यपालांच्या हस्ते वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभात राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदके घोषित करण्यात आली होती. आज मंगळवारी (दि. ५) दुपारी १२ वाजता राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते या पदकांसह शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होईल, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त समारंभ ५ मार्च रोजी कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाईन पद्धतीने झाला. या समारंभात ६२ हजार ३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली. तसेच विद्यापीठाच्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रपती सुवर्णपदक आणि कुलपती सुवर्णपदक प्राप्त स्नातकांच्या नावांची घोषणा करण्यात आलीसन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रपती सुवर्णपदक रसायनशस्त्र अधिविभागाच्या ऐश्वर्या मोरे यांना तर कुलपती सुवर्णपदक सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयातील स्वाती पाटील यांना प्रदान केले जाणार आहे. तसेच सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील केंट क्लब, कोल्हापूर निर्मित 'शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्रावीण्य पारितोषिक व स्मृतिचिन्ह' मयुरेश शिखरे (विवेकानंद महाविद्यालय) यांना प्रदान केले जाणार आहे.

05 APR 2022 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विश्वात्मक संत साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी प्रमुख पाहुणे : दोन दिवस कार्यक्रमांची रेलचेल

प्रतिनिधी
कोल्हापूर



उदयपूर पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, भारत सरकार संस्कृती मंत्रालय आणि मुंबई इंडसमून मीडिया प्रा. लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने पहिले विश्वात्मक संत साहित्य संमेलन कोल्हापुरातील महासैनिक दरबार हॉलमध्ये होणार आहे. या संमेलनाचे उद्घाटन ५ रोजी सकाळी ११ वाजता राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते होईल. संमेलनाध्यक्षपदी न्यायमूर्ती डॉ. मदन महाराज गोसावी आहेत. स्वागताध्यक्ष संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे आहेत. प्रमुख उपस्थिती पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, डॉ. अरूणा ढेरे, डॉ. प्रकाश खांडगे यांची आहे.

उद्घाटनापूर्वी सकाळी ६ वाजता अंबाबाईचे पूजन रंगनाथ महाराज नाईकडे, आनंदराव गायकवाड यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी ८ वाजता आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते होईल. त्यानंतर दिवसभर सांस्कृतिक कार्यक्रम, शोधनिबंध वाचन सादरीकरण होणार आहे. सकाळी १० वाजता ग्रंथ दालनाचे उद्घाटन होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी राहुल रेखावार तर जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे,

पान ९ पहा

# विश्वात्मक संत साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन

पान १ वरून

डॉ. राजेंद्र सिंग, डॉ. अच्युत दाणी, न्यायमूर्ती सुधीर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी १०.३० वाजता चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन, ११ वाजता मुख्य उद्घाटन सोहळा, दुपारी १२ वाजता ग्रंथ स्मरणिकेचे विमोचन, १२.३० वाजता संमेलनाध्यक्षांचे बीजभाषण, संत शिरोमणी पुरस्कार वितरण, विश्वात्मक संत जीवन गौरव पुरस्कार, दुपारी १ वाजता विदेशी अभ्यासक शोधनिबंध वाचन, दुपारी २.४५ वाजता भक्तीसंप्रदाय आणि विश्वात्मकता, दुपारी ४.१५ वाजता भक्ती-वसा की व्यवसाय महाचर्चा, सायंकाळी ६ वाजता भक्तीसंगीत महोत्सव होईल. बुधवार ६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता अस्वस्थ वर्तमानात संत विचारांची भूमिका या विषयावर परिसंवाद. सकाळी ११.३० वाजता संत साहित्य व लोकतत्व विषयावर परिसंवाद, दुपारी १ वाजता अभ्यासकांचे शोधनिबंध वाचन, दुपारी २.४५ वाजता संत साहित्य आणि पर्यावरण विषयावर परिसंवाद, दुपारी ४ वाजता संमेलनाचा समारोप होणार आहे. तरी संत साहित्य संमेलनाचा जास्तीत जास्त जनतेने लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांतर्फे केले आहे.

Times of India

# Governor to visit Kolhapur city today

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Maharashtra governor Bhagat Singh Koshyari will be in Kolhapur city on Tuesday morning to inaugurate the first Vishwatmak Sant Sahitya Sammelan arranged by the central ministry of cultural affairs.

Several ministers from the state will also be attending the two-day event. The Vishwatmak Sant Sahitya Sammelan has been organised in Kolhapur on behalf of the West Zone

## TWO-DAY EVENT

Cultural Center, Udaipur, ministry of culture- Government of India. It will be held on April 5 and 6 at Mahasainik Darbar Hall, Kasba Bawda in Kolhapur city.

Koshyari will inaugurate the first of its kind event on Tuesday at 11 am. A *Granth Dindi* will also be taken out on Tuesday morning from Kasba Bawda pavilion ground to Mahasainik Darbar hall. Kolhapur Municipal Corporation administrator Kadambari Balkawade will start the *Granth Dindi*.